# भारतीय अर्थव्यवस्था

## • विकासाचे प्रश्न
## • जनवादी उपाययोजना

श्रीनिवास खांदेवाले



# भारतीय अर्थव्यवस्था विकासाचे प्रश्‍न व जनवादी उपाययोजना

**दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिटट्यूट**
**अन्नपूर्णा परिवार**

सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिटट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

E-mail : ammco-ordinatorpune@annapurnapariwar.org
ammco-ordinatormumbai@annapurnapariwar.org

Website : www.annapurnapariwar.org

किंडल आवृत्ती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

मो. : ९३७२७१५४२१, ९९२२९६७०००

किंमत : ₹ ६०/-

# भारतीय अर्थव्यवस्था विकासाचे प्रश्न व जनवादी उपाययोजना

**लेखक :-** श्रीनिवास खांदेवाले

मुखपृष्ठ : रुचा पाटील

**किंमत : ₹ ६०/-**

**प्रकाशक**
**डॉ. मेधा पुरव सामंत**
**दादा पुरव रिसर्च अ‍ॅण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट अन्नपूर्णा परिवार**
सुवास्तू प्रेस्टिज, आदित्य गार्डन सिटीजवळ, मेघमल्हार सोसायटी शेजारी,
आर.एम.डी. इन्स्टिट्यूटच्या मागे, मुंबई-गोवा हायवेजवळ,
वारजे, पुणे - ४११०५८

**मुद्रणस्थळ**
अंजूम बाइंडिंग वर्क्स, हमीद शेठचा गाळा, मेसेंट रोड, फ्रि वे समोर,
खांब क्र. २००, शिवडी (पू.), मुंबई - ४०००१५, दूरध्वनी : २४९८५२९०

# प्रकाशकाचे दोन शब्द



अन्नपूर्णा परिवाराच्या अंतर्गत कॉ. दादा पुरव रिसर्च ॲण्ड ट्रेनिग इन्स्टीट्यूटच्या वतीने ''भारतीय अर्थव्यवस्थेच्या - विकासाचे प्रश्न - जनवादी उपाय योजना'' ही प्राध्यापक श्रीनिवास खांदेवाले यांनी लिहिलेली पुस्तिका संस्थापक दिना निमित्त प्रसिद्ध करण्यास आनंद होत आहे.

प्राध्यापक श्रीनिवास खांदेवाल हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - नागपूर विद्यापीठामधअये अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते, व्यवस्थापन शास्त्राच्या विभागाचे संचालक होते. कामगार नेते कॉ. रामभाऊ रुईकर या नागपूर येथील रिसर्च इन्स्टीट्यूटचे ते विश्वस्त आणि पदाधिकारी आहेत. दैनिक लोकसत्तामध्ये त्याचे दर पंधरा दिवसांनी ''चतुरस्त्र'' ह्या सदरात ते ताज्या आर्थिक घडामोडीवर भाष्य करणारे लेख लिहीत असतात.

या पुस्तिकेमध्ये श्री. खांदेवाले यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वातंत्र्यपूर्व काळापासुनच्या कालखंडाचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून विश्लेषण केले आहे. स्वातंत्र्योतर कालखंडात आर्थिक विकासाचा परिप्रेक्ष कसा तयार झाला, १९९१ सालचा आर्थिक पेचप्रसंग आणि त्या पार्श्वभमींवव आखलेले नविन आर्थिक धोरण याचा उहापोह केला आहे. प्रचलीत आर्थिक प्रश्नांची मांडणी आणि त्या वरील जनवादी उपाय योजना यांची चर्चा केली आहे.

अन्नपूर्णा परिवारात काम करणाऱ्या तरुण कर्मचाऱ्यांना, वस्ती पातळीवरील तरुण सभासदांना, परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना भारचे आर्थिक प्रशअनांचे समग्रपणे समजून घेण्यास ही पुस्तिका अत्यंत उपयुक्त ठरेल.

जगातील, देशांतील, महाराष्ट्र राज्यातील आर्थिक संकट अधिक गडद होत जाणार आह. अशा पाश्‍र्वभूमीवर यंदाच्या संस्थापक दिनाचे औचित्य साधून आम्ही ह्या तीन पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोत.

आमच्या विनंतीला सकरात्मक प्रतिसाद देऊन श्री. श्रीनिवास खांदेवाले यांनी भारती अर्थव्यवस्था विकासाचे प्रश्‍न जनवादी उपाययोजना ही पुस्तिका लिहिल्याबद्दल अन्नपूर्णा परिवारातर्फे आम्ही त्याचे शतश: आभारी आहोत.

**डॉ. मेधा पुरव-सामंत**

सेक्रेटरी

अन्नपूर्णा परिवार

■

# भारतीय अर्थव्यवस्था विकासाचे प्रश्न जनवादी उपाययोजना

श्रीनिवास खांदेवाले

**अनिवार्य आर्थिक योजना**

रोजच्या आपल्या जीवनात आपले कार्यक्षेत्र ठरून जाते; त्याच्या आधारे जीवनातील काही उद्दिष्टे ठरून जातात, एक विचारपद्धती बनून जाते. ही सामान्य सकारात्मक प्रक्रिया झाली. पण तिला काही नकारात्मक पैलू असतात. त्यापैकी एक पैलू असा की, आपण आपले जीवन त्यातली उद्दिष्टे, विचारपद्धती ह्यांचा आपल्या भोवती कोष करून घेतो, त्याला स्वयंपूर्ण मानतो व त्याच्या बाहेर काही जग आहे, त्या जगाचे प्रश्न आपलेसुद्धा प्रश्न आहेत ह्याकडे दुर्लक्ष करतो. आपली जीवनप्रणाली स्वायत्त आहे असे आपण मानतो. प्रत्यक्षात तसे नाही. आपण सगळे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व्यवहारांच्या, समाजभर पसरलेल्या, साखळीत वेगवेगळ्या बिंदूंवर गुंफलेले असतो, पण आपल्याला ते माहिती नसते. गळ्यातील गोफाच्या वरच्या टोकावरील मण्यांची खालच्या पदकाशी भेट होते का? महानगरातील महागड्या हॉटेलमध्ये जेवणाऱ्यांना पोळीतील गहू आणि भातातील तांदूळ किती दूरवरच्या शेतकरी स्त्री-पुरुषांनी आपल्यापर्यंत येण्याकरता किती कष्ट घेतले असतील ह्याची कल्पना येत नाही. धानाच्या रोपांची रोवणी ६ इंच ते एक फूट पाण्यात उभे राहून करावी लागते. आपण समजतो की हॉटेलच्या काऊन्टरवर आम्ही पैसे दिले आहेत, त्या आधीच्या व्यवहारांशी आमचा काय संबंध? त्यात भर पडते स्वत:च्या आर्थिक हितापुरते जगण्याची ह्या सगळ्या कारणांनी बऱ्याच प्रमाणात समाजातले लोकसंख्या गट एकाच देशात, प्रांतात राहतात पण त्यांना इतरांच्या सुखदु:खांची जाणीव नसते, जाणीव करून घेण्याची

गरजही वाटत नाही, म्हणून इच्छाही निर्माण होत नाही. सगळ्यांनी केलेल्या प्रयत्नांनी निर्माण झालेल्या उत्पादनाचे मूल्य जोडून प्रांत, राज्य, देश ह्यांची जणू काही ते एकसंध आहेत असे समजून चर्चा केली जाते. ब्रिटिशांच्या काळात सरकारी नोकरीत असलेला त्यावेळचा वर्ग आणि आज निर्माण झालेला शहरी समाज ग्रामीण समाजापासून असाच अलिप्त राहतो. खुद्द शहरी समाजात अतिधनाढ्य उद्योजक-व्यापारी-मोठे कलाकार; त्यांच्या खालोखाल धनाढ्य उद्योजक-व्यापारी, राजकारणी, शेअर दलाल; मोठमोठे व्यवस्थापक, तंत्रशास्त्रज्ञ; नंतर सरकारी-खासगी क्षेत्रातला मध्यम-वर्गीय नोकर; त्या खालोखाल चाळींमध्ये-जुन्या घरांमध्ये राहणारा निम्न-मध्यम वर्ग आणि शेवटी झोपडपट्ट्यांमध्ये राहणारा स्थानिक-स्थलांतरित मजूर वर्ग; इतके गट दिसून येतात. ह्या विभाजनाला समाजात स्तर तयार होणे (स्तरीकरण = stratification ) असे म्हटले जाते. अशा अवस्थेत विविध स्तरांतील लोकांमध्ये (किमती देऊन) आर्थिक, (मतदान करून) राजकीय संबंध काही प्रमाणाता निर्माण होतात, पण सामाजिक संबंध निर्माण होताना दिसत नाहीत. ह्या कारणांकरता देश-विदेशांतील अर्थशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ ह्यांनी आपल्या अभ्यासांमध्ये ह्या गोष्टीची दखल घेऊन, विलगतेवर चिंता व्यक्त करून, अधिक एकात्मिक समाजाची आवश्यकता प्रतिपादित केली आहे.

स्पष्टच आहे की पूर्वीसुद्धा जेवढ्या विषमता जास्त (गरीब-श्रीमंत, कारखानदार-शेतकरी, अल्प शिक्षित-अतिउच्च शिक्षित, स्त्री-पुरुष, कुशल-अकुशल, सत्ताधीश-सत्ताहीन) तेवढे स्तर निर्माण होणार. त्यांच्यामध्ये आपसांत स्पर्धा चालत आणि सामाजिक दृष्टीने पाहिल्यास आपण आर्थिकदृष्ट्या जरी कुमकुवत असलो तरी जाती-उपजातींनी कसे श्रेष्ठ आहोत हे दाखविण्याचा प्रत्येक समाजघटक प्रयत्न करीत असे. त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वी वर वर्णन केलेले समाजचित्रण समाजात सर्रास दिसून येत असे. सगळा समाज हा विविध बाजूंनी जखडलेला होता आणि स्वातंत्र्यानंतर ती बंधने गळून पडण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होईल, असे साऱ्यांना वाटत असे.

## राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा परिपोष

मध्ययुगात मोगलांनी विविध प्रदेशांवर अचानक मोठ्या संघटित ताकदीने हल्ले करून, स्थानिक राजे-रजवाड्यांना बेसावध अवस्थेत जिंकून आपले साम्राज्य स्थापन केले. त्याचा प्रतिकार म्हणून स्थानिक राजे (काही प्रमाणात) एकमेकांशी

सहकार्य करू लागले. माझ्या मते राष्ट्रीयत्वाच्या राजकीय भावनेचा तो पहिला हुंकार असावा. परंतु मोगलांना त्यांच्या मूळ पहाडी प्रदेशांपेक्षा भारताचा मैदानी, नद्यांनी ओतप्रोत (उष्ण हवेचा का असेना) असा भारत आवडला व ते येथून परत गेले नाहीत. आपल्या ऐष व आरामासाठी त्यांनी येथल्याच गोळा केलेल्या (कर-खंडणी-लूट) पैशाचा उपयोग येथेच किल्ले-महाल-उद्यान बांधण्यात; संगीत-साहित्य-स्थापत्य-कला व कलाकार जोपासण्यात खर्च केला. एका अर्थाने तो पैसा देशातल्या देशातच फिरत होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या निमित्ताने सतराव्या शतकात ब्रिटिश भारतात आले. मुळात ती कंपनी विदेश व्यापारासाठी नाममात्रच होती. त्यांच्या अंतर्गत पत्र व्यवहारावरून दिसून येते की, काही कारणांमुळे व्यापार बंद झाला किंवा त्यातील नफा कमी झाला तर इंग्लंडमधील लोकांचे राहणीमान (रोजगार, उत्पन्न, शाही थाट) कमी होईल, म्हणून त्यांनी भारतातील (शोषण करून उत्पन्न मायदेशी पाठविण्यासाठी) राज्य व्यवस्थाच काबीज केली.

त्यामुळे त्या व्यवस्थेच्या विरुद्ध १८५७चे जे स्वातंत्र्य युद्ध घडून आले ते निश्चितपणे ब्रिटिशांचे हेतू ओळखून भारतीय नेत्यांनी टाकलेले पाऊल होते. त्यामध्ये पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, महाराष्ट्र इत्यादी सर्व ठिकाणच्या संस्थानिकांनी आणि तेथील प्रत्येक राज्यातल्या जनतेनी त्या उठावामध्ये भाग घेतला. त्यामुळे भाषा, धर्म, पंथ, इत्यादी सगळे विविध असतानासुद्धा त्या काळात भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली, हे आजच्या तरुण वर्गाने ध्यानात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१८५७च्या स्वातंत्र्य युद्धाचा परिणाम म्हणून ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीचा परवाना काढून घेऊन त्यांनी भारतात स्थापन केलेले राज्य स्वत:च्या नियंत्रणाखाली घेतले. १८५८ साली महाराणी व्हिक्टोरियाने जाहीरनामा प्रकाशित केला की, ब्रिटिश सरकार भारतातील लोकांचे धर्म, भाषा, संस्कृती, परंपरा इत्यादींना धक्का लावणार नाही. त्याच्या जोडीला तेव्हापासून अत्यंत वेगाने भारतात विश्वविद्यालये स्थापन केली गेली; रेल्वेचे जाळे पसरले गेले; तारसेवा व डाकसेवा निर्माण केली गेली; कृषी संशोधन आणि विकास हे कार्यक्रम सुरू केले; १८६५-७० या काळात अमेरिकेतून कापूस व इतर कृषी माल तेथील यादवी युद्धामुळे इंग्लंडला मिळेनासा झाला म्हणून त्यांनी युद्धपातळीवर कापूस उत्पादक म्हणून संपूर्ण साम्राज्यातला चांगला प्रदेश म्हणून विदर्भाची निवड केली; न्यायव्यवस्था निर्माण केली, इत्यादी.

अनेक जण असे मत मांडतात की, ब्रिटिशांना आपण विरोध का केला, त्यांनी तर आपल्याला इतक्या सुधारणा दिल्या. त्याचे उत्तर असे आहे की हे सगळे त्यांनी स्वत:च्या शोषण व्यवहारांकरता निर्माण केले आणि त्यांची अपेक्षा एवढीच होती की आम्ही तुमचे सर्व मुद्दे मान्य करतो तुम्ही आमचे आर्थिक शोषण सुरळीत चालू द्या! म्हणून १८८५ मध्ये काँग्रेस निर्माण झाल्यानंतर, भारतीय नेते त्यात भाग घेऊ लागल्यानंतर, एक वैचारिक लहर निर्माण झाली ती अशी की ब्रिटिश लोक हे सर्व करीत आहेत ते त्यांच्या स्वार्थाकरिता, भारताच्या कल्याणाकरता नव्हे म्हणून दादाभाई नौरोजी, भाबतोष दत्ता, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व नंतरच्या सर्व नेत्यांनी एकच मुद्दा ध्यानामध्ये घेतला की, आमचा विकास आम्ही करू ते आमचे स्वराज्य राहील म्हणून टिळकांनी म्हटले होते की 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क' आणि गांधीजींनी म्हटले होते की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आम्हाला त्यातून स्वराज्य आणि सुराज्य निर्माण करावयाचे आहे. ही भावना घेऊन भारतातील सर्व प्रांतीय, सर्व धर्मीय, सर्व भाषीय आणि सर्व पंथीय लोक एकत्र येऊन त्यांनी यशस्वी लढे देऊन १९४७ साली स्वातंत्र्य मिळविले.

## आजच्या तरुणांचे व नागरिकांचे परमकर्तव्य

आपण आतापर्यंत राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा आणि लोकांच्या मनातील एकतेचा जो आढावा घेतला आहे त्यावरून आपल्याला असे दिसेल की आजच्या तरुणांचे (ते कितीही सुशिक्षित असोत) आणि सजग नागरिकांचे परमकर्तव्य असे आहे की राष्ट्रीयत्वाची आणि एकतेची भावना आपण सतत टिकवून ठेवली पाहिजे व त्यामध्ये जागतिक घटनांच्याद्वारे येणारे अडथळेसुद्धा प्रगल्भ बुद्धीने पार केले पाहिजेत. त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या वातावरणात भारतासारखा १३५ कोटी लोकांचा देश जणू काही बुद्धीबळातील एक मामुली सोंगटी आहे अशी भावना कधीही निर्माण होऊ देता कामा नये, आणि नेहमी झाशीच्या राणीपासून ते टिळक, गांधी, नेहरू, आंबेडकर यांच्यापर्यंत जी स्वतंत्र बुद्धी दाखविली गेली ती दाखवून भारताला ज्या प्रकारचे स्वराज्य, संविधानामध्येसुद्धा अपेक्षित आहे ते निर्माण करण्यासाठी तरुण आणि इतर नागरिक (महिलांसहित) यांनी पुढे आले पाहिजे ही आत्यंतिक गरज आहे. त्यामुळे समाज घटकांमधील आपसांतील एकोपा वाढून स्वातंत्र्यानंतरची नवी संस्कृती निर्माण करणे हे जे कार्य अपूर्ण राहिलेले आहे ते पूर्ण करण्यासाठी सज्ज होणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्याचा लढा मोगलांच्या विरुद्धचा असो ब्रिटिशांच्या विरुद्धचा, तो

भारतीय राष्ट्रीय भावनेचा परिपोष म्हणूनच विकसित होत होता. पण त्याचा अलीकडचा संदर्भ घेण्यासाठी म्हणून आपण १८८५ पर्यंत येतो तेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही भारतीयांच्या भावना जाणून घेण्यासाठी ब्रिटिशांनी तयार केली हे सत्य आहे. परंतु त्या काळात भारतातल्या विभिन्न प्रदेशांमध्ये विविध भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये एकच सूत्रतेची भावना पूर्णपणे निर्माण झाली होती का असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देणे कठीण आहे ते ह्यासाठी की वेदकाळापासून किंवा त्याच्या आधीपासून भारतीय समाज इथे राहत आला, पण राष्ट्रीयत्वाच्या भावना आधुनिक पद्धतीने निर्माण झालेल्या नव्हत्या. १८८५ पासून लोकांना एक मंच असा मिळाला की जिथे ब्रिटिश सरकारच्या विरोधातसुद्धा आपल्या काय मागण्या आहेत याची चर्चा करू शकत होते. ब्रिटिश सरकारला ही त्यातला सकारात्मक जो आशय आहे तो जाणवू लागला. त्यामध्ये आपण लोकांच्या भाषा, प्रदेश, गरजा, विकासाची पातळी हे सगळे पाहिले तर भिन्नता बरीच होती. परंतु आम्हाला सगळ्यांना मिळून कोणीतरी शोषत आहे ही भावना आणि आम्हाला नवीन राष्ट्र मिळावे त्यातून प्रकट होत होती.

आता आपण विकासाच्या प्रक्रियेकडे वळू. भारतामध्ये स्वातंत्र्याला आता ७५ वर्षे होत असताना आपण जर स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्याच्या पूर्वीचा काही काळ असे पाहिले तर आपल्याला दिसेल की स्वातंत्र्यापूर्वीचा दरवर्षीचा राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर जो अर्थशास्त्रज्ञांनी मोजला तो साधारण अर्धा टक्के असा होता तर मग त्याच्यातून त्यावेळेला भारतात चाळीस कोटी लोक होते त्यांना किती हिस्सा मिळत असेल याची आपण कल्पना करू शकतो. म्हणून त्याकाळचे राहणीमान असे होते की रस्ते नाहीत, पाण्याच्या सोयी नाहीत, राहण्याची जुन्या पद्धतीची घरे, शिक्षणाच्या सोयी अपुऱ्या, औषधाच्या सोयी अपुऱ्या. हे सगळे जर बघितले तर आपल्याला दिसेल की १९४७ मध्ये जेव्हा आपण स्वतंत्र झालो तेव्हा विकास कामांची किती गरज होती. त्यामध्ये आपण एक मुद्दा आणखीन जोडायचात राहून गेला तो असा की लोक बेरोजगार होते आणि त्यामुळे प्रत्येकाला असे वाटायचे काहीही होवो पण मला काम मिळाले पाहिजे, मी माझ्या कुटुंबाचे पोट भरू शकलो पाहिजे. म्हणून स्वातंत्र्याच्या पहाटेला लोकांमध्ये जी भावना होती ती अशी की आता आम्हाला सगळ्याच प्रकारचा विकास पाहिजे. भारतामध्ये ज्या वेळेला स्वातंत्र्य मिळेल अशी अंधूक आशा वाटायला लागली १९३५च्या प्रांतिक सरकारच्या कायद्यामुळे. त्यावेळेला लोकांच्या मनामध्ये हा प्रश्न जरूर निर्माण

झाला की जर स्वातंत्र्य मिळाले तर त्याच्या नंतरचा भारत कसा असावा, त्याची अर्थव्यवस्था कशी असावी, त्याची राज्यव्यवस्था कशी असावी, याची सामाजिक व्यवस्था कशी असावी, लोकांना त्याच्यातून काय मिळेल काय नाही? त्या प्रश्नांमध्येत ब्रिटिशानी निर्माण केलेला सरंजामशाही जमीनदारी वर्ग मोठा आणि बाकीचे सगळे गरीब अशी विषमता होती म्हणून लोक या मताचे झाले होते की सगळ्यांना समसमान असा विकास मिळायला पाहिजे. रोजगार सगळ्यांना मिळायला पाहिजे, अन्नधान्य सगळ्यांना मिळाले पाहिजे, चांगले जीवन मिळायला पाहिजे ते कुठे आहे का अशी जगभर चर्चा चालू असते त्यावेळेला १९१७ मध्ये सोविएत संघामध्ये जी क्रांती झाली आणि सोवियत संघ निर्माण झाला तर त्यामध्ये ती क्रांती कामगारांनी आणि शेतकऱ्यांनी घडवून आणली होती. राज्यव्यवस्थेच्या राज घराण्याच्या विरोधात घडवून आणली होती आणि आम्हाला दुसरं काही ऐकायचं नाही आम्ही लढायला तयार आहोत अशा तऱ्हेची परिस्थिती साधारण १९१३ पासून चालली तर सतरामध्ये ती क्रांती पूर्ण झाली. त्यावेळचे रशियाचे राजे होते ते परागंदा झाले, पळून गेले आणि तिथे कामगारांचे-शेतकऱ्यांचे राज्य निर्माण झाले. अशा कुठल्या तरी प्रकारचे राज्य भारतातही स्थापन व्हावे असे जर बहुसंख्य भारतीयांना वाटले असले तर ते साहजिकच म्हणावे लागेल.

यानंतर आपण देशामध्ये शेती उद्योग, रोजगार, शिक्षण, हवामान बदल, महिला विकास इत्यादी बाबतीत जे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यांचे स्वरूप थोडक्यात लक्षात घेऊन त्यावरील जनवादी उपाययोजना मांडण्याचा प्रयत्न करू.

## भारतीय अर्थव्यवस्थेचे विकास प्रश्न

### शेती

भारतातल्या शेतीमध्ये महत्त्वाचा प्रश्न असा आहे की शेतकऱ्यांच्या तुलनेने उपलब्ध शेत जमीन कमी आहे. बहुसंख्य शेतकरी अत्यल्प भूधारक (म्हणजे एक हेक्टरच्या आत) आणि अल्प भूधारक (एक ते दोन हेक्टरमधील) आहेत. त्यातले बहुसंख्य शेतकरी हे कोरडवाहू म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत, म्हणून ते गरीब आहेत. महानगरांमध्ये, कारखान्यांमध्ये त्यांच्यासाठी ताबडतोब चांगला पगार देणाऱ्या नोकऱ्या नसतात म्हणून ते एक तर गरीब म्हणून खेड्यात राहतात नाहीतर गरीब म्हणून महानगरांमध्ये झोपड्यांमध्ये राहतात. म्हणून ग्रामीण दारिद्र्य हे आपल्याला खेड्यांमध्ये आणि शहरांमध्येसुद्धा ओसंडलेले दिसते. जेवढी काही भाषा शेतीच्या तंत्रज्ञानाची व उत्पादकतेची बोलली जाते ती प्रामुख्याने मध्यम

व मोठ्या शेतकऱ्यांना लागू पडते. आपण गेल्या ७५ वर्षांमध्ये भारतात शेतकऱ्यांना शेती शिक्षणसुद्धा देऊ शकलो नाही आणि तंत्रज्ञानही त्यांना बियाण्यांच्या पाकिटांमधून व यंत्रांच्या रूपाने विकत घ्यावे लागते. त्याचा नफा देशी आणि विदेशी कंपन्यांकडे सरळपणे जातो. जर आजच्या तरुणांना आणि सजग नागरिकांना ग्रामीण आणि शहरी दारिद्र्य नको असेल तर त्यांनी शेतकऱ्यांचे शोषण तंत्रज्ञानाच्या मार्फत किंवा बियाण्यांच्या मार्फत बंद झाले पाहिजे, शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या मुलामुलींना त्यांच्या क्षमतेपर्यंत कोणत्याही प्रकारचे उच्चशिक्षण विनामूल्य मिळाले पाहिजे आणि सगळ्यांना आरोग्य व्यवस्था माफक किमतींमध्ये मिळाली पाहिजे, अशा मागण्या कराव्या लागतील. पूर्वी राजे लढाया जिंकून राज्य वाढवीत असत. त्यामुळे राज्याच्या नागरिकांवर त्यांचा हक्क आहे असे समजले जाई. परंतु आता संघटित समाजात मतदारच सरकार निवडून देतात त्यामुळे जे प्रश्न सुटत नाहीत त्या प्रश्नांची एक तर जाण मतदारांना नाही किंवा त्यांना ते प्रश्न सुटावेत असे वाटत नाही, असा अर्थ लोकशाहीत लावला जातो. करिता सुशिक्षित तरुणांनी या सगळ्या प्रश्नांबद्दलची आपली जाण वाढवून जे राजकीय पक्ष हे प्रश्न सोडविण्यात तयार असतील त्यांनाच निवडून द्यावे. गौतम बुद्धाने म्हटले होते की अत्त दीप भव: म्हणजे अंधारामध्ये तू स्वत:चा दीपक बन. (याचा अर्थ आजच्या तरुणांनी व्यवस्थित शिक्षण घेणे व समाजकार्यात भाग घेणे आवश्यक आहे.)

शेतीच्या विकासाचा म्हणजे अन्नधान्य, बागायची पिके इत्यादींच्या विकासाचा दर देशाकरता आदर्श म्हणून दरसाल सुमारे ४ टक्के असावा असे मानले जाते. परंतु हवामान तांत्रिक मुद्दे, जागतिक कृषी बाजार इत्यादी मिळून तो दर तेवढा राहीलच याची शाश्वती नसते. त्या दृष्टीने एक फरक आपण लक्षात घेतला पाहिजे की शेती उत्पादन हे निसर्गाच्या सान्निध्यात चालते आणि त्यावर माणसाचे नियंत्रण जवळपास नसते. मात्र औद्योगिक उत्पादन हे कारखान्यांच्या आत, उष्णतामान वगैरे नियंत्रित करून, चालत असते त्यामुळे ते माणसाच्या नियंत्रणात असते. आवश्यकता पडल्यास कारखान्यांमध्ये तीन पाळ्यांमध्ये काम करून, यंत्रांची संख्या वाढवून, उत्पादन वाढवता येते किंवा उलट पद्धतीने कमीही करता येते. परंतु शेतीत मात्र निसर्गाच्या विरोधात जाऊन शेतकरी उत्पादन कमीही करू शकत नाही आणि वाढवूही शकत नाही. मग तो उत्पादन झाल्यानंतर विक्रीची किंवा व्यापाराची जी पद्धत असेल त्या पद्धतीतून जी काही चांगली किंमत मिळेल ती मिळवण्याचा प्रयत्न करतो. परंतु स्वातंत्र्यापासून आतापर्यंत जर शेतकरी समाज हा

गरीबच राहिला आहे आणि उद्योजक समाज हा श्रीमंत राहिला आहे तर त्या दोन्ही क्षेत्रांचे अर्थशास्त्र कसे कार्य करते हे आपल्या लक्षात येवू शकेल. पूर्वीच्या काळापासून जशी लोकसंख्या वाढू लागली त्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांनी सिंचन वाढवून, नवीन तंत्रज्ञान स्वीकारून, शेती उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आज २०२०-२१ मध्ये शेती क्षेत्रात विक्री आणि व्यापार यांच्या दृष्टीने मोठे बदल घडून येण्याची शक्यता आहे. या स्थितीमध्ये केंद्र शासनाने तीन कृषी कायदे पारित केले आहेत आणि सरकारचे म्हणणे असे आहे की ह्या तीन कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे शेती क्षेत्राची भरभराट होईल. त्यासाठी बाजार समितीसारख्या संस्थांमध्येसुद्धा सरकारने काही बदल प्रस्तावित केले आहेत. डॉ. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने सुमारे १५ वर्षांपूर्वीच अशी सूचना केली होती की बाजारामध्ये केवळ धान्येच नव्हेत तर सर्वच प्रकारच्या कृषी मालाला संपूर्ण उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा एवढी किमान आधारभूत किंमत शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे. तेव्हापासून केंद्र सरकारमध्ये असलेल्या विविध राजकीय गटबंधनांनी विशेषत: गहू आणि तांदूळ या पिकांना किफायतशीर असे आधारभूत मूल्य दिले. त्याचा परिणाम म्हणून राजस्थान, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश ह्या गव्हाच्या पट्ट्यामध्ये शेतकऱ्यांनी भरपूर उत्पादन करून आपली आर्थिक उन्नती करून घेतली आहे. मात्र केंद्र सरकारने आता पारित केलेल्या तीन कायद्यांमध्ये किमान आधारभूत किमतींची तरतूद नाही. परंतु शेतकऱ्यांच्या दबावाखाली सरकार गहू, तांदूळाला किमान आधारभूत किंमत देत आहे.

आज प्रश्न असा उभा राहिला आहे की वरील तीनही कायद्यांमध्ये शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत मिळेल याचा उल्लेखही नसल्यामुळे आणि कृषी मालाचा व्यापार हा कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या बाहेरही बिनाशुल्क, मुक्तपणे चालू शकेल अशी तरतूद केल्यामुळे शेतकऱ्यांना हे कळून चुकले आहे की येणाऱ्या कृषिमाल व्यापार व्यवस्थेत देशी व आंतरराष्ट्रीय कृषि व्यापार कंपन्यांकडून त्यांचे शोषण अटळ आहे आणि ते जरी कायद्याप्रमाणे शेतीचे मालक राहिलेत तरी करार शेतीप्रमाणे ते मोठ्या कंपन्यांचे गुलामच राहतील. ही परिस्थिती लक्षात आल्याबरोबर देशभरचे शेतकरी आणि विशेषत: उत्तर भारताचे शेतकरी, हे प्राणपणाने संघटित झाले आहेत. त्यांनी सरकारला वारंवार निवेदने करून हे तीन कायदे मागे घ्यावे अशी मागणी केली. परंतु केंद्र शासनाने ते पूर्णपणे अमान्य केल्यामुळे शेतकऱ्यांनी विविध राज्यांमधून दिल्लीला संसदेवर येण्याचा मनसुबा

जाहीर केला. त्यांना दिल्ली शहराच्या बाहेर तीन–चार राष्ट्रीय हमरस्त्यांवर अडविले गेले. त्यामुळे त्यांनी तेथेच शांततामय अहिंसात्मक सत्याग्रह सुरू केला, त्याला आज नऊ महिने पूर्ण झाले आहेत. सरकारही हटू म्हणत नाही आणि शेतकरी म्हणतात की ते कायदे परत घेतल्याशिवाय आम्ही आमच्या घरी जाणार नाही. शेतकऱ्यांच्या संघटनांनी राजकीय पक्षांना पूर्णपणे बाजूला ठेवले आहे. त्यामुळे राजकीय पक्ष शेतकऱ्यांना भडकावीत आहेत असे म्हणता येत नाही. नंतर सरकारने असे म्हटले की शेतकऱ्यांना काही लोक भ्रमित करीत आहेत आणि त्यांनी त्यांचा भ्रम स्वतः दूर करावा. शेतकऱ्यांच्या सुमारे चाळीस एकत्र काम करणाऱ्या संघटनांनी सरकारला असे म्हटले आहे की तुम्ही आमच्याबरोबर बसा आणि आमचा भ्रम दूर करा! परंतु सरकारने आतापर्यंत असे काही केले नाही. जुलै २०२१ मध्ये सरकारने त्यांना मर्यादित संख्येमध्ये दिल्ली शहरात येऊन शांततामय पद्धतीने आपले म्हणणे मांडण्याची परवानगी दिली आहे. म्हणून लोकसभेचे पावसाळी सत्र संपेपर्यंत जंतरमंतर येथे रोज नव्याने शेतकरी येतात आणि दिवसभर आंदोलन करून पुन्हा परत जातात. पलीकडच्या काळात काय घडेल ते आज सांगणे कठीण आहे.

यामध्ये जनवादी भूमिका कोणती असू शकेल? उघडपणे, शेतकऱ्यांना चांगल्या किमती मिळाव्यात, त्यांचे शोषण होऊ नये, त्यांचे राहणीमान वाढावे आणि त्यासाठी देशातील सर्व जाणकार नागरिकांनी शेतकऱ्यांच्या प्रति अभिन्न अशी एकजूट दाखवावी आणि शेतकऱ्यांचे आंदोलन यशस्वी होईल याच्यासाठी सगळ्या प्रकारचे प्रयत्न करावेत अशी ती भूमिका असू शकेल. त्यादृष्टीने पाहिल्यास असे दिसते की उत्तरेतील चार-पाचही राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या शिवाय इतर व्यवसायांमध्ये गुंतलेला समाज आहे (इंजिनीयर्स, अभिनेते, लष्करात नोकरी करणारे लोक, विदेशात स्थायिक झालेले लोक, आणि खुद्द दिल्ली शहरात शहरी व्यवसायांमध्ये असलेले लोक) तो शेतकऱ्यांच्या आंदोलनाला तन, मन, धनाने मदत करीत आहे. वरील चार-पाचही राज्यांमधून लोक आपापसात पंचायतींमध्ये आणि महापंचायतींमध्ये ठरवून, आपली शेतीची कामे सांभाळून, महिलासुद्धा ट्रॅक्टर चालवीत दिल्लीच्या सीमांपर्यंत येऊन आंदोलनात भाग घेत आहेत आणि काही काळानंतर आपल्या गावांकडे जाऊन त्यांची जागा दुसरे शेतकरी घेत आहेत. कदाचित जगातील हे सगळ्यात मोठे, दीर्घकाळ चाललेले आणि शांततामय आणि अहिंसात्मक पद्धतीने आयोजित केलेले शेतकरी आंदोलन असेल. त्यामध्ये

देशातील इतर राज्यांमधील शेतकरी आणि इतर नागरिकांनी देशातील शेती आणि शेतकरी जगावा, तो संपन्न अवस्थेत असावा असा आग्रह धरून त्यांना आवश्यक तेवढी मदत करणे हे आपल्या सगळ्यांचे पुरोगामी आणि जनवादी कर्तव्य बनते. एका मुद्द्याची आपण नोंद घेतली पाहिजे की उत्तर भारताच्या शिवाय इतर अनेक शहरीकरण झालेल्या राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या समस्यांबद्दल पूर्ण जाण आणि पूर्णपणे सहकार्याची तळमळ असेलच असे सांगता येत नाही. कारण शहरी समाजाला वाटते की आम्ही आणि शेतकरी वेगळे आहोत. सध्याचा प्रश्न हा शेतकऱ्यांचा आहे आणि त्यांना तो सोडवू द्या. थोडासाही खोलात जाऊन विचार केला तर आपल्याला असे दिसेल की शेतकऱ्यांनी नियोजन करून एक वर्ष धान्यच पिकविले नाही तर १३५ कोटी देशाच्या लोकांची अवस्था काय होईल याची कल्पना करणे कठीण आहे. म्हणून त्यावर आजच्या परिस्थितीमध्ये दिसणारे जनवादी आणि पुरोगामी उत्तर असेच आहे की उत्पादनाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये लोक कार्य करीत असोत (शेतमजूर, शेतकरी, ग्रामीण कारागीर, जंगल काम करणारे आदिवासी, शहरी श्रमिक) हे सगळे उत्पादनाच्या एकाच साखळीमध्ये बांधलेले आहेत आणि एका घटकावर झालेला अन्याय हा समाजाच्या इतर घटकांवर थोड्या काळामध्ये होणारच आहे कारण ती परिणामांची शृंखला जोडलेली आहे. करिता निष्कर्ष असा निघतो की आपण संपूर्ण समाज एकात्मिक आहे हे समजावून घेतले नाही किंवा मान्य केले नाही तरी आपण सगळे उत्पादन निर्मितीच्या आणि राष्ट्रीय उत्पन्न वाटणीच्या एका शृंखलेचे घटक आहोत. म्हणून स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेला संघर्ष हा लोकशाही आणि पुरोगामी पद्धतीने शेतकऱ्यांच्या बाजूने सुटावा ही भूमिका आजच्या शहरी, उच्चशिक्षित, तंत्रशिक्षित, शहरी, तरुण-तरुणींची असली पाहिजे. ही काळाची गरज आहे. अशा भूमिकेचे प्रबोधन व प्रसारण सर्व जनतेमध्ये करण्याचे कार्य जनवादी संघटनांनी, विद्यार्थी संघटनांनी आणि न्यायप्रिय राष्ट्रीय पक्षांनी करण्याची आवश्यकता आहे.

## उद्योग आणि रोजगार

१९४७ नंतर देशाच्या शीर्ष नेतृत्वामध्ये बहुमत असे होते की देशाला नियोजित अर्थव्यवस्था पाहिजे आणि जर देशातील १५० वर्षांचे दारिद्र्य हटवायचे असेल तर ज्या प्रमुख उद्योगांपासून मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय उत्पन्न निर्माण होते ते उद्योग भारत सरकारच्या व राज्य सरकारांच्या अधीन असावेत. त्यानुसार सुमारे १९५२ पासून, पंचवार्षिक योजना सुरू झाल्यानंतर १९९१ पर्यंत म्हणजे

बाजारावर आधारित नवे आर्थिक धोरण स्वीकारेपर्यंत, हे धोरण कायम होते. अर्थात त्या धोरणाच्या मागे योजनाबद्ध विकास, योजनाबद्ध रोजगार निर्मिती आणि योजनाबद्ध गरिबी-निर्मूलन हे करीत समाजवादी पद्धतीची कुठली तरी अर्थव्यवस्था निर्माण करावी अशी इच्छा नेत्यांमध्ये आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पक्षामध्ये होती. मात्र १९५२ ते १९९१ या काळातसुद्धा ज्या राजकीय पक्षांना समाजवाद मान्य नव्हता, नियोजन मान्य नव्हते आणि बाजारावर आधारित भांडवलशाही पद्धती हवी होती असे पक्ष सरकारच्या धोरणाला विरोध करीतच होते. त्याचबरोबर खुद्द काँग्रेस पक्षामध्येसुद्धा व्यापारी-उद्योजक आणि त्यांचे नेते यांचा एक गट असा होता की जो आतून सुप्तपणे सरकारच्या धोरणांना विरोध करीत होता. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रांच्या उद्योगांचे महत्त्व टिकविणे, रोजगार निर्माण करणे, गरिबी निर्मूलन करणे या सगळ्यांना ज्यांचा विरोध होता तो सतत चालू असल्यामुळे विकासाची प्रक्रिया ही एका सरळ रेषेत चालू नव्हती. मात्र त्यामध्ये सातत्य होते आणि भविष्यातील विकासाच्या दिशेचे मानचित्र लोकांना दिसत होते. उघड आहे की भारत स्वातंत्र्यानंतर गरिबीतून बाहेर आल्यामुळे भारताच्या जवळ विदेशी वस्तूची जास्त आयात करून त्यांची किंमत परदेशी चलनामध्ये देण्याइतके परदेशी चलन उपलब्ध नव्हते. म्हणून जवाहरलाल नेहरू, डॉ. आंबेडकर, सुभाषचंद्र बोस व इतर नेते भारताची अर्थव्यवस्था आत्मनिर्भर असावी या मताचे होते आणि त्याकरता जितके औद्योगिक उत्पादन देशात करता येईल तितके करून देश आत्मनिर्भर बनवावा या मताचे होते. आत्मनिर्भरतेचा अर्थ असा की आमच्या देशाची जेवढी क्षमता आहे तेवढे उत्पादन आम्ही देशातच करू आणि ज्याकरता आमच्याजवळ तंत्रज्ञान, भांडवल किंवा इतर सुविधा नसतील तेवढीच आम्ही आयात करू. परंतु यामुळे अमेरिका आणि युरोपातील औद्योगिक विकसित राष्ट्रे भारतावर नाराज झाली. भारतासारखी मोठी बाजारपेठ आपल्याला मिळत नाही म्हणून त्यांची भारताच्या औद्योगिक धोरणावर सतत टीका चालू असे. १९६९ मध्ये खासगी बँकांमध्ये आर्थिक संकट निर्माण झाल्यामुळे मोठ्या हिमतीने बँक कर्मचाऱ्यांच्या संघटना आणि इंदिरा गांधींची प्रधानमंत्री म्हणून राजकीय इच्छा यांचा परिणाम म्हणून बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले. आज २०२१ मध्ये केंद्रातील सरकार पुन्हा सरकारी बँका आणि सरकारी उद्योग यांचे खासगीकरण करण्याची घिसाडघाई करीत आहे.

देशामध्ये औद्योगिक विकास व रोजगार यांचे नियोजन चालू असताना केंद्र

सरकारमध्ये केंद्रीय योजना आयोग होता आणि राज्यांच्या पातळीवर राज्य नियोजन आयोग होते यांच्याद्वारा गावखेड्यापर्यंत रोजगार आणि उत्पादन कसे वाढवावे याची उद्दिष्टे, पद्धती आणि वित्तीय व्यवस्था निर्माण केली गेली होती. त्यामध्ये आपोआपच शासकीय निर्णयांचे महत्त्व जास्त आणि खासगी उद्योगांचे महत्त्व कमी अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. त्याचा विरोध म्हणून खासगी क्षेत्र जिथे जमेल तिथे आणि जितका जमेल तितका विरोध शासकीय धोरणांना करीतच होते.

१९६५चे भारत पाक युद्ध, १९७२चा मोठा दुष्काळ, १९७७चे काँग्रेसचे सरकार पडून जनता पक्षाचे सरकार निर्माण होणे, १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या; त्यानंतर लागोपाठ राजकीय अस्थिरता, १९८९ मध्ये सोवियत संघाचे पतन या सर्व काळात देशातील आर्थिक परिस्थितीकडे दुर्लक्ष होत गेले. आयातीवर नियंत्रण राहिले नाही त्यामुळे विदेशी चलनाची गरज नियंत्रणाबाहेर वाढत गेली. परंतु त्यासाठी निर्यात वाढवून विदेशी चलन कमाविणे जे आवश्यक असते ते केले गेले नाही. परिणाम असा झाला की, विदेशी व्यापारात विदेशी चलनाची कमाई कमी आणि देणी जास्त अशी तूट निर्माण झाली. त्याकरता विदेशी चलनाचे कर्ज घेणे आवश्यक होऊन गेले आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून हे कर्ज मागितल्याबरोबर त्यांनी मुख्य अटी अशा मांडल्या की भारताने आयात आणि निर्यात व्यापार खुला करावा, त्यावरचे कर कमी करावे, श्रीमंत लोकांच्या उत्पन्नावरचे कर कमी करावे, खासगी उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, सार्वजनिक उद्योगांवर निर्बंध आणावे आणि रुपयाचे अवमूल्यन करावे. भारत सरकारला त्या क्षणी दुसरा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे भारताने त्या अटी मान्य केल्या. त्यामुळे भारतातील सार्वजनिक उद्योगांचे महत्त्व, समाजवादाकडे झुकणारी अर्थव्यवस्था व शासनाचे उचित असे नियंत्रण हे सर्व संपले. तोपर्यंत प्रत्येक योजनेद्वारा केंद्र पातळीवर आणि राज्यांच्या पातळीवर किती रोजगार निर्माण होईल याचे जे नियोजन केले जात होते ते सुद्धा संपले. म्हणून १९९१च्या आर्थिक बदलांना नवे आर्थिक धोरण असे म्हटले जाते.

त्यानंतर ज्या ज्या क्षेत्रात खाजगी भांडवलाला नफा वाटेल तिथे ते उत्पादन वाढवेल, पाहिजे ते तंत्रज्ञान वापरेल, शक्य आहे तेवढी निर्यात करतील आणि आवश्यक आहे तेवढी आयात केली जाईल, अशी मान्यता निर्माण झाली. विदेशी चलनाची निर्माण होणारी गरज विदेशी भांडवलाला मुक्त प्रवेश देऊन भागविली जाईल असे म्हटले गेले.

१९९१ ते २०२१ या ३० वर्षांच्या काळात तंत्रज्ञानाचा विकास बऱ्याच प्रमाणात झाला. परंतु ते तंत्रज्ञान रोजगार वाढविणारे नसल्यामुळे त्या विकासाला रोजगारविहीन (जॉबलेस ग्रोथ) असे म्हटले गेले आणि वाढत्या लोकसंख्येला, त्यातील तरुणांच्या लोकसंख्येला, रोजगाराचे आश्वासन मिळेल असा कोणताही अधिकार १९९१ पासून सरकारच्या जवळ राहिला नाही.

२०२१ मध्येसुद्धा ज्या पद्धतीने सरकार सार्वजनिक उद्योगांमध्ये गुंतलेले भांडवल समभागांच्या रूपाने विकून त्या उद्योगांचे खाजगीकरण करत आहे. त्यामुळे बेरोजगारी इतर अनेक देशांच्या तुलनेने भारतात जास्त आहे आणि बुडत्याचा पाय खोलात जात आहे का अशी शंका येऊ लागलेली आहे.

सध्याच्या बेरोजगारीमध्ये आणि विकासाच्या कमी दरामध्ये कोरोनाचा परिणाम आहेच, परंतु २०१६ पासून चालत आलेल्या मंदीवर हे सरकार प्रभावी उपाययोजना करू शकलेले नाही हे स्पष्ट झालेले आहे. म्हणून भविष्यकाळामध्ये विकास कोणत्या प्रकारचा होईल आणि रोजगार कोणत्या प्रकारचा निर्माण होईल याचे मानचित्र सध्या सरकारपुढेही नाही आणि जनतेपुढेही नाही.

१९९१च्या नवीन आर्थिक धोरणाप्रमाणे सगळा औद्योगिक विकास खाजगी क्षेत्र करील आणि रोजगारही खाजगी क्षेत्रच निर्माण करील अशी धारणा आहे. आज आपण तपशिलात जाऊ पाहिले तर असे दिसेल की खाजगी औद्योगिक क्षेत्र हे समाजाच्या गरजांप्रमाणे वाढेल अशी खात्री देता येत नाही, ते नफ्याच्या दिशेने धावत राहील, त्याचप्रमाणे ते समाजाला आवश्यक एवढ्या रोजगार निर्माण करील याचीसुद्धा शाश्वती नाही. स्वत:ला आवश्यक नफा देण्याइतकाच रोजगार ते क्षेत्र निर्माण करते. सरकारपुढे रोजगार निर्माण करण्याकरिता फक्त एकच महत्त्वाचे क्षेत्र असते ते म्हणजे महामार्ग, बंदरे, विमानतळ, राहण्याच्या इमारती, कारखान्यांच्या इमारती निर्माण करण्याकरिता श्रमिक वापरणे. त्यामध्ये कौशल्य निर्माण करण्याचा, वाढविण्याचा आणि श्रमिकांना जन्मभर पुरेल एवढा रोजगार देण्याची सुद्धा व्यवस्था नसते म्हणून सरकारचे औद्योगिक धोरण काय आहे? आणि रोजगार धोरण काय आहे? असा प्रश्न विचारल्यास असे आढळून येते की सरकारकडे धोरणच नसते.

ज्या देशांमध्ये मोजकी लोकसंख्या व कामगार संख्या असेल तिथे बेरोजगारीचा प्रश्न फार तीव्र होत नाही पण भारतासारख्या देशात खाजगी क्षेत्रावर जर औद्योगिकीरणाची आणि रोजगार निर्माण करण्याची जबाबदारी नसेल तर अशा देशांत श्रमिकांच्या रोजगाराचे काय होईल असा प्रश्न निर्माण होतो म्हणून आपण सर्व

नागरिकांनी आपल्या चर्चांमध्ये, आपल्या मागण्यांमध्ये आणि निवडणुकीच्या वेळी मतदानामध्ये देशात पुरेसे औद्योगिकीकरण असावे आणि पुरेसा रोजगार निर्माण होत राहावा, अशी आग्रही मागणी करण्याची आवश्यकता आहे. (अन्यथा तो समाज जबाबदार न राहता व कल्याणकारी न राहता स्वैराचारी व हिंसेकडे झुकणारा होईल. असे होऊ नये याची आपण सर्वांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे.)

आजच्या तरुणांनी रोजगाराच्या प्रश्नावर जनवादी विचार कसा करावा हा एक मोठा प्रश्न आहे. जे उच्चतंत्र शिक्षित आहेत तेवढ्यांना रोजगार मिळून जातो. परंतु मुंबईमध्ये २५-३० हजार रुपये महिना मासिक पगार मिळविणाऱ्या अभियांत्रिकी तरुणाला नागपूर, औरंगाबाद व इतर प्रादेशिक स्तरावर १५-२० हजार रुपये मिळणे मुश्कील झाले आहे. कारण उद्योगांचे केंद्रीकरण सगळ्याच राज्यांमध्ये महत्त्वाच्या महानगरांमध्ये झालेले आहे आणि खाजगी क्षेत्राला स्वातंत्र्य दिल्यामुळे औद्योगिकीकरणाचे विकेंद्रीकरण व्हावे हा अधिकार केंद्र आणि राज्य सरकारांकडे राहिलेला नाही त्यामुळे प्रादेशिक आणि ग्रामीण क्षेत्रात विकास कसा घडून येईल, औद्योगिकरण कसे घडून येईल? आणि तरुणांना रोजगार कशा प्रकारचा मिळेल? ही सगळी आव्हाने आहेत.

अशा परिस्थितीमध्ये तरुणांनी, सजग नागरिकांनी आणि सामाजिक संस्थांनी सरकारवर दबाव आणला पाहिजे की तुम्हाला काय बदल करायचे असतील ते करा, परंतु औद्योगिकीकरणाचे आणि रोजगाराचे विकेंद्रीकरण करून अल्पविकसित आणि अविकसित प्रदेशांच्या लोकांमध्ये आशेचा किरण निर्माण करणे ही येणाऱ्या काळाची गरज आहे.

## शिक्षण आणि हवामानबदल

आधुनिक समाजाला संघटित व जबाबदार समाज असे म्हटले जाते. अशा समाजामध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीला किमान काहीतरी शिक्षण मिळेल आणि त्यातून त्या व्यक्तीची नवसंशोधनाची प्रवृत्ती निर्माण होईल किंवा नवे उत्पादन शोधू शकेल व समाजाच्या उन्नतीमध्ये भर टाकू शकेल, असे असणे आवश्यक आहे. परंतु स्वातंत्र्यापासून आजपर्यंत आपण शिक्षणाच्या पर्वताकडे पाहिल्यास शिखरावरच्या शिक्षण संस्था या खूप छान असतात (आंतरराष्ट्रीय तुलनेच्या - वर्ल्ड क्लास) परंतु जसजसे आपण महानगरांपासून प्रादेशिक राजधान्या, जिल्हा केंद्रे, तालुका केंद्रे, खेड्यांपर्यंत जातो तसतशा शिक्षणाच्या सुविधा कमी होताना दिसतात. आजही वाहिन्यांवर अनेक राज्यांमधील ग्रामीण शिक्षणाची परिस्थिती प्रत्यक्षात पाहिली तर इमारती नाहीत, शिक्षक नाहीत, शिक्षण सुविधा नाहीत असे आपल्याला पहावयास

मिळते ही जर परिस्थिती स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर अस्तित्वात असेल तर आपण ७५ वर्षांमध्ये विकास घडत असताना जनवादी बदल काय केले आणि सामान्य माणसाच्या दारापर्यंत विकास सुविधा का नेल्या नाहीत? याचे उत्तर देण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर येते. त्याचे उत्तर, आमच्या देशाचा इतिहास फार उज्ज्वल होता, आमचा समाज पूर्वीपासून खूप उत्तुंग आहे वगैरे सांगून आपण कोणाचे समाधान करू शकत नाही. फार तर ती आपण आपलीच केलेली फसवणूक असेल.

ऑगस्ट महिन्यात टोकीयोमध्ये जे ऑलिंपिक खेळ झालेत त्यामध्ये भारतातील ज्या महिलांनी पदके मिळविली त्यांची कौटुंबिक परिस्थिती पाहिल्यास अत्यंत मामुली अशी आहे. काही पदक विजेत्या महिला आपआपल्या प्रांतांमध्ये शेतमजूर म्हणून कामे करतात. त्यामुळे उत्तम खेळाडू तयार होण्यासाठी पुरेसा पैसा शिक्षण व्यवस्थेने खर्च न करणे आणि त्या ग्रामीण मुलामुलींनी पदके प्राप्त केल्यानंतर त्यांच्यावर सोने आणि पैसा यांचा वर्षाव करणे ही आजची विडंबना आहे.

त्यामुळे प्राथमिक शिक्षणापासून भाषा, विज्ञान, तंत्रज्ञान व प्रत्यक्ष अनुभव मिळणाऱ्या शाळा, पुरेसा शिक्षक वर्ग, शारीरिक शिक्षणाच्या पुरेशा सोई, पुरेसा पैसा दिल्याशिवाय आपण स्वतंत्र भारतात सगळ्यांना शिक्षणाचे स्वातंत्र्य उपभोगण्याचा आनंद देत आहोत असा अर्थ होणार नाही. बऱ्याच अभ्यासकांनी असा प्रश्न विचारला आहे की आपण सरकारी खर्चामध्ये कमी शुल्क आकारून आय.आय.टी. आणि एम्स (ऑल इंडिया मॅनेजमेंट इन्स्टिटयूट्स) अशा संस्थांमध्ये ज्या बुद्धिमान विद्यार्थ्यांना शिक्षण देतो त्यापैकी भारतात किती राहतात आणि परदेशात किती जातात? सर्वांना ठाऊक आहे की या उच्चशिक्षित तरुणांचे उद्दिष्ट उच्च शिक्षण घेऊन आपला समाज उन्नत करण्याच्याऐवजी विदेशात नोकऱ्या करणे आणि तिकडेच स्थायिक होणे हे असते. परिणाम असा होतो की, जे भारतात राहणार आहेत अशा ग्रामीण तरुणांना आपण शिक्षणाच्या पुरेशा सुविधा निर्माण करून देत नाही आणि ज्यांना आपण त्या निर्माण करून देतो ते विदेशात चालले जातात. ही शिक्षणव्यवस्थेची विडंबना थांबविणे सरकारची जबाबदारी आहे आणि त्याप्रकारचा आग्रह धरणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

शिक्षणाशी जोडलेला मुद्दा हवामान बदलाचासुद्धा आहे. हवामान बदलाचा व्यावहारिक अर्थ असा आहे की औद्योगिक विकासाकरिता, शहरे चालविण्याकरिता, जी यंत्रे, मोटरगाड्या वापरल्या जातात, कोळशावर निर्माण केलेली वीज वापरली

जाते, त्या सर्वांपासून धूर आणि उष्णता २४ तास निर्माण होत राहते. (खनिज कोळसा आणि तेल यांना भूमिगत ऊर्जा स्रोत म्हटले जाते). गरम हवा वजनाने हलकी असल्यामुळे ती आकाशात / अवकाशात साठून राहते आणि मग नव्याने तयार होणारे ढग एक तर त्या उष्णतेने तयारच होत नाहीत म्हणून नियमितपणे पडणारा पाऊस पडत नाही आणि अवर्षण निर्माण होते. जर निर्माण झालेले ढग हे वरील उष्ण हवेला थंड करण्याइतके मोठे असतील तर एकदम मोठ्या ढगांनी अतिशय जास्त पाऊस पडतो, समुद्रांना पूर येतात, ढगफुटी होते, पहाडांमध्ये पाऊस पडून दरडी कोसळतात आणि पुरामुळे सुपीक जमीन आणि पेरलेली शेती वाहून जाते आणि शेतीसंकट तयार होते.

जुलै-ऑगस्ट २०२१ आपण हे सर्व भारतभर होताना पाहिले आहे. विदेशांमध्ये धृव प्रदेशापर्यंत साचलेली उष्णता तेथील बर्फ वितळण्यास कारणीभूत होते म्हणून दक्षिण आणि उत्तर हे दोन्ही ध्रुव प्रदेश आता बर्फाची घरे राहिलेली नाही. ते बर्फ कोसळून समुद्रात पडून नद्यांना पूर येऊन सतत वाहत जात आहे. त्यामुळे हजारो वर्षांपासून थंड असलेले ध्रुव प्रदेशांचे हवामान उष्ण होऊ लागलेले आहेत व त्याचे परिणाम सगळ्या जगभर होत आहेत ही मोठी आपदा आहे. बर्फाच्या अशा कोसळण्यामुळे जगभर समुद्राची पातळी तीन ते चार फुटांनी वाढल्यास ते वाढलेले पाणी किनाऱ्यावरील शेकडो खेड्यांमध्ये घुसते आणि त्या गावांना नष्ट करते. तेथील पिके, फळबागा, प्राणिसृष्टी हे सर्व त्यामध्ये नष्ट पावते. या घटना आपण चित्र वाहिन्यांवर रोजच पाहतो. हवेमध्ये साचलेली उष्णता ही जंगलांवरून प्रवास करू लागली तर तेवढ्याही उष्णतेने त्या जंगलांमध्ये आगी लागतात आणि युरोप अमेरिकेमध्ये हजारो चौरस किलोमीटरचा प्रदेश हा आगीच्या भक्षस्थानी पडतो. त्यामध्ये पिके, प्राणी, झाडे, वेली या सर्वांचा समावेश असतो. त्यामुळे रोज आपण यांत्रिकी पद्धतीने हवामान बदल होत आहे असे म्हणत असलो तरीही त्याचा अर्थ आपण गांभीर्याने समजावून घेतला आहे असे दिसत नाही. त्याही पलीकडे जाऊन हे सर्व कारखानदारीमुळे घडत आहे, कोळशापासून वीज निर्माण करण्यामुळे घडत आहे, मोटरगाड्या व कारखाने याच्यामध्ये तेल आणि डिझेलचा वापर करण्यामुळे घडत आहे हे मान्यही करायला आपण तयार होत नाही. कारण जास्त मोटरगाड्या, जास्त कारखाने, विजेचा जास्त वापर यांनाच आज आपण विकास चिन्हे मानतो.

जितकी उष्णता औद्योगिक प्रणाली निर्माण करते त्यापैकी सगळ्यात जास्त वाटा विकसित औद्योगिक राष्ट्रांचा आहे. त्याचा अर्थ असा होतो की हवामान

बदलाचे जेवढे घातक परिणाम होत आहेत ते प्रामुख्याने विकसित राष्ट्रांनी इतर - आफ्रिकन, अरब, आशियाई - देशांवर लादले आहेत. ते कमी करण्याची व पृथ्वीचे वाढलेले उष्णतामान कमी करण्याची जबाबदारी प्रामुख्याने विकसित राष्ट्रांची आहे. परंतु बेगुमानपणे ती राष्ट्रे ती जबाबदारी स्वीकारण्यास तयार नाहीत किंवा आंतरराष्ट्रीय करार झाल्यास ते तंतोतंत पाळण्याची तयारी दाखवत नाहीत. कारण त्यांचे उच्च राहणीमान हे मोटारगाड्यांची संख्या, विजेचा वापर, एअर कंडिशनर्स, कारखान्यांची संख्या या सर्वांवर अवलंबून आहे. त्यामुळे आज आपण संकटे आली तरी चालतील पण आम्ही जगाचे उष्णतामान कमी करणार नाही अशा बेफिकीर परिस्थितीत कदाचित वावरत आहोत.

अर्थात संयुक्त राष्ट्रांमध्ये आणि इतर मंचांवर शास्त्रज्ञ, विचारवंत, साहित्यिक व इतर जबाबदार लोक सतत चिंता व्यक्त करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आपण भारतीय नागरिक आहोत. विकसित देश पुरेसे सहकार्य देत नाहीत म्हणून आम्हीही काही करणार नाही अशी भूमिका कोणताही देश घेऊ शकत नाही आणि भारताने तशी भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे नंतरचा प्रश्न असा उद्‌भवतो की विकास तर झाला पाहिजे, त्याची फळे सामान्य लोकांपर्यंत तर पोहोचायला पाहिजेत, परंतु त्याचे विघातक परिणामही आपल्याला टाळता आले पाहिजेत. हे खरे आहे की भारतात असंख्य सेवासंस्था आहेत ज्या हवामान बदलाच्या घातक परिणामांचा आघात कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याचबरोबर अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये आणि संस्थांमध्ये हवामान बदलाचे विशेष अभ्यास होत आहेत. भारतात पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या मोटारगाड्या विजेवर चालाव्या व प्रदूषण कमी व्हावे हा त्यापैकीच एक स्वागतार्ह बदल आहे. परंतु ही उदाहरणे मोजकीच झाली. मुख्यत: प्रदूषण कमी करणे आणि उत्पादन व्यवस्थेतील भूमिगत ऊर्जा स्रोतांचा उपयोग कमी करणे याचे शिक्षण आपल्याला लहान मुलांपासून प्राथमिक व उच्च शाळांमध्ये देऊन त्यांची जिज्ञासा जागृत करून कारखानदारांमध्ये जाणीव निर्माण करून पृथ्वीचे उष्णतामान कमी करण्यामध्ये भारतीय समाज काय सहभाग निभवू शकतो याची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे, कारण मानवतेचे अस्तित्व आणि भवितव्य त्यावरच अवलंबून आहे.

## महिला विकास

भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशातील सर्व नागरिकांचे भविष्य सुधारावे ही अपेक्षा व्यक्त केली गेली होती. अनेक वेळा आपण काही गोष्टी स्पष्टपणे न मांडता त्या

अस्तित्वात आहेत असे गृहीत धरून चालतो. आपण महिलांचा विकास इतर विकासाबरोबर आपोआप होणार आहे असेही गृहीत धरून चाललो. परंतु समाजाच्या व्यवहारांमध्ये कोणत्याही गोष्टी आपोआप घडून येत नाहीत. त्या स्वतंत्रपणे मांडाव्या लागतात, त्यासाठी कायदे करावे लागतात, प्रशासकीय व्यवस्था निर्माण करावी लागते आणि सगळ्यात मोठे म्हणजे समाजाची मानसिकता बदलावी लागते. जोपर्यंत समाज नवीन सन्मानाच्या गोष्टी स्वीकारत नाही तोपर्यंत कायदे आपल्या जागेवर राहतात आणि अपेक्षित सामाजिक बदल घडून येत नाही. महिलांचा विकास ही अशी अत्यंत महत्त्वाची समाज विकासाची बाब आहे.

महिलांच्या बाबतीत परंपरेने आपण असे समजत आलो की महिलांनी फक्त घरामध्ये राहून घर चालवायचे आहे. तेच त्यांचे क्षेत्र आहे आणि त्यापेक्षा जास्त महत्त्वाकांक्षा त्यांनीही धरू नये आणि समाजानेही धरू नये. म्हणून बरेच वेळा प्रत्येक नवीन गोष्टीला वेळोवेळी आणि जागोजागी घरातून आणि बाहेरून विरोध होत असतो. महिलांचा विकास ही एक साधी सरळ प्रक्रिया नसून अत्यंत गुंतागुंतीची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रक्रिया आहे. इतिहासात नोंद आहे की जेव्हा सावित्रीबाई फुले शाळेत जात असत तेव्हा त्यांच्यावर भरपूर टीका टिप्पणी होत असे. समाजातील काही निवडक महिलांना घरातून सुरक्षा आणि प्रोत्साहन मिळून त्यांनी पुढे जाणे हे नवीन नाही, त्याची अनेक उदाहरणे इतिहासात आहेत परंतु प्रश्न सर्वसामान्य महिलांचा आहे, ज्या कोणत्याही समाजाचा ५० टक्के भाग आहेत. म्हणून महिला ही अशिक्षित, निरक्षर, अकुशल व कुटुंबावर अवलंबूनच राहणारी असावी का हा मोठा प्रश्न आहे. इतर देशांमध्ये घर सांभाळणाऱ्या महिलांचेसुद्धा आर्थिक योगदान किती आहे याचे मोजमाप केले जाते आणि त्यावरून त्यांचे महत्त्व जाणून त्यांना आर्थिक मदतही दिली जाते. मात्र अजूनपर्यंत 'आई करते तरी काय' असे नाटक लिहावे लागत असेल आणि त्यातून महिलांच्या विकासाचा प्रश्न मांडला जात असेल तर आपण महिला विकासामध्ये खूप काही पुढे गेलो नाही असे दिसून येईल. आजही केंद्र सरकारने 'बेटी बढाओ, बेटी पढाओ' अशी घोषणा आणि कार्यक्रम सुरू ठेवला आहे हेसुद्धा आपल्याला दाखवते की देशातली प्रत्यक्ष परिस्थिती काय असेल!

सारांश, महिलांच्या विकासाकडे पुरुष आणि महिला असा भेद कौटुंबिक पातळीवर, शैक्षणिक पातळीवर, रोजगाराच्या पातळीवर आणि वेगवेगळ्या प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळण्याच्या पातळीवर असू नये, हे महत्त्वाचे सूत्र आहे. असे दिसेल की केवळ आर्थिक विकास झाल्यामुळे महिलांचा शैक्षणिक, सामाजिक

आणि सांस्कृतिक विकास आपोआप होईल असे नाही. आपण युरोप, अमेरिकेकडे पाहिल्यास असे दिसेल की तिथे महिलांचा शैक्षणिक आणि आर्थिक विकास कदाचित जास्त चांगला झाला आहे परंतु सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासात स्त्रियांचा सहभाग तेवढा आहेच असे दिसून येत नाही. म्हणून भारतात जे घडत आहे ते सर्व अपूर्ण किंवा चूक आहे आणि विदेशात मात्र सर्व चांगले घडत आहे असे म्हणण्याचा हेतू नव्हे. परंतु भारतातल्या परिस्थितीनुसार आपण महिलांच्या विकासासाठी पुरेसे सर्वांगीण प्रयत्न करत आहोत की नाही, असा तो मुद्दा आहे. त्यात आपण असे म्हणू इच्छितो की जेवढे समाजाकडून महिलांकरता जोबदल घडून येणे अपेक्षित आहे आणि आवश्यक आहे ते घडताना दिसत नाहीत. तसे झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळाल्यास ७५ वर्षे झाली आणि ते स्वातंत्र्य आमचा देदीप्यमान ठेवा आहे. असे म्हणणे आपल्याला कठीण जाईल.

शालांत परीक्षामध्ये, विद्यापीठाच्या परीक्षामध्ये आणि आता ऑगस्ट २०२१ मध्ये टोकीयोमधील ऑलिम्पिक खेळांमध्ये भारतातील स्त्रियांनी जी उत्तम कामगिरी करून दाखविली आहे तिचा आपल्याला जेवढा अभिमान वाटतो का असा प्रश्न आपणा सर्वांनी स्वत:ला विचारावयाचा आहे. कारण हे सर्व प्रकारचे यश संपादन करण्यासाठी आपण महिलांना कुटुंबपातळीवर आणि संस्थापातळीवर पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करून देतो का आणि त्या यशाबरोबरच त्यांना मानसिक समाधान मिळेल याची काळजी घेतो का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्या महिलेने टोकीयो ऑलिम्पिकमध्ये रौप्य पदक मिळविले तिची पौष्टिक भोजनाची, प्रशिक्षणाची पूर्ण व्यवस्था नाही आणि ती स्वत:च्या गावात शेतमजूर म्हणून काम करते हे जर सत्य आहे तर त्यामध्ये प्रामुख्याने त्या महिलेची जिद्द हीच कारणीभूत आहे आणि समाजाचे योगदान थोडेसेच आहे असे दिसून येईल. जर महिलांची बुद्धी, त्यांचे कौशल्य, त्यांचे प्रावीण्य यांच्या सतत चाचण्या घेऊन त्यांना शासकीय मदतीचा भरपूर हात मिळाल्याशिवाय त्या वेगवेगळ्या क्षेत्रांत आपली छाप पाडू शकणार नाहीत. यामध्ये जसे त्यांचे वैयक्तिक नुकसान होते तसेच समाजालासुद्धा सुबुद्ध, कौशल्यवान महिला श्रमिकांचा पुरवठा होऊ शकत नाही. हे सर्व होत असताना आपण ढोबळमानाने स्त्री-पुरुष समान अशा घोषणा करू नये कारण जे जे पुरुष करतो तेच स्त्रीने करावे अशी अपेक्षा करणेसुद्धा चूकच होईल. कौशल्याची अनेक क्षेत्रे अशी आहेत की जेथे स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक चांगले कार्य करू शकतात आणि करतात.

एक अपेक्षा आणि प्रयत्न आपण केला पाहिजे तो असा की आयुष्यात कोणत्याही वयामध्ये स्त्रियांच्या शिक्षणात आणि कौशल्यप्राप्तीत खंड पडू नये.

त्याकरिता त्यांना नेहमीपेक्षा जास्त सोयी-सुविधा, कौटुंबिक आणि सामाजिक आधार मिळेल ह्याची संस्थात्मक व्यवस्था केली पाहिजे.

काही दिवसांपूर्वी एका श्रमिक संघटनेकरिता प्रस्तुत लेखकाला **'सर्वांसाठी पेन्शन'** या विषयावर लिहिण्याची सूचना केली गेली होती. सामान्यपणे आपण असे समजतो की सर्वांसाठी पेन्शन म्हणजे सर्व पुरुषांसाठी पेन्शन. कारण पुरुष हा अजूनही कुटुंबाचा कर्ता मानला जातो आणि स्त्री जर स्वत: नोकरी किंवा व्यवसाय करत नसेल तर तिचे कुटुंबातले स्थान गौण आहे असे मानले जाते. परंतु स्त्री काय आहे हे नीट समजावून घेतले तर असे दिसेल की ती आपल्या मुलांची केवळ जन्मदात्रीच नव्हे तर पहिली परिचारिका आहे, डॉक्टर आहे, भाषाशिक्षक आहे. हे सगळे बाहेरून विकत मिळू शकत नाही. ती त्या स्त्रीची देण आहे. मोठे झाल्यानंतर ती मुलींचे संसार थाटून देते. मुलांचे संसार थाटून देते. पण नंतर तिच्यावर पैशासाठी इतरांवर अवलंबूनच राहण्याची वेळ येत असेल, तर असा समाज सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत निकृष्ट आहे असे समजले पाहिजे. आपल्या आजी किंवा पणजी कदाचित शाळेत गेल्या नसतील, परंतु म्हणून त्या असंस्कृत होत्या असे नव्हे. त्यांच्या संस्कारांमधूनच आपण सर्व संस्कारित होतो. म्हणून स्त्रियांचे लहानपणापासूनचे शिक्षण, पोषण, कौशल्यप्राप्ती, रोजगार आणि निवृत्तिवेतन एवढी संपूर्ण काळजी घेणारा समाज आपण निर्माण करू शकलो पाहिजे, तरच देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि स्त्रियाही स्वतंत्र झाल्या असा त्याचा अर्थ होईल!

## भारतातील आजची भांडवलशाही

पूर्वी लिहिल्याप्रमाणे १९४७ पूर्वी सुमारे १५० ते २०० वर्षे भारतात ब्रिटिश भांडवलशाही होती. तिच्या आधाराने सगळ्या प्रदेशांमध्ये प्रादेशिक भांडवलशाही होती. संविधान पारित झाल्यानंतर जी संकल्पना प्रसारित झाली ती अशी होती की भारतामध्ये अर्थव्यवस्थेची मुख्य क्षेत्रे सरकारच्या किंवा सार्वजनिक क्षेत्राच्या अधीन असावी आणि जी कार्ये सरकार करू शकत नाही ती खासगी क्षेत्राच्या अधीन असावी. अशा प्रकारची मिश्र अर्थव्यवस्था नेहरूंच्या विचारांतून प्रसारित झाली, परंतु ही त्वरित निर्माण होणारी व्यवस्था नसून दीर्घकाळात ती तशी असावी असा मतितार्थ होता. कारण स्वराज्य मिळाल्याबरोबर सरकारजवळ अशी क्षेत्रे निर्माण करण्यासाठी पैसा, प्रशासन व्यवस्था, तंत्रज्ञान इत्यादी नव्हते. हळूहळू ते निर्माण केले जावे असा तो विचार होता. त्यामधील महत्त्वाचे कारण असे होते की देशात १५० वर्षे साचलेले दारिद्र्य दूर करणे हे एकदम शक्य होत नाही आणि त्याकरता

खासगी क्षेत्राकडून ते केले जाईल याची कायदेशीर खात्री नसते. म्हणून मुख्य जबाबदारी सरकारची आणि दुय्यम जबाबदारी खासगी क्षेत्राची अशी ती संरचना होती. खासगी क्षेत्राला अर्थातच हे मान्य नव्हते आणि खासगी उद्योजकांना त्यांचे पूर्ण स्वातंत्र्य हवे होते. म्हणून त्यामध्ये जो वैचारिक संघर्ष आहे तो आपण त्या काळापासूनचा समजावून घेणे आवश्यक आहे. पूर्वी लिहिल्याप्रमाणे १९९१ पर्यंत देशात पंचवार्षिक योजना आणि त्यांच्या मार्फत गरिबी निर्मूलनाचे कार्यक्रम शक्य तितक्या क्षमतेने अमंलात आणले जात होते. परंतु १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्याबरोबर सरकारला गौण भूमिका स्विकारावी लागली आणि खासगी क्षेत्राला जागतिक पातळीवर प्रमुख भूमिका मिळाली. त्या प्रक्रियेमध्ये खासगी क्षेत्राचे स्वातंत्र्य पूर्णपणे उपयोगात यावे म्हणून त्या उद्योजकांना कायद्याचे संरक्षण द्यावे, कर कमी ठेवावे, प्रशासकीय निर्बंध काढून टाकावे हे सगळे सरकारला करावे लागले. उत्पन्नावरील कर, कंपन्यांच्या उत्पन्नावरील कर, संपत्ती कर हे सगळे कमी करावे लागले. या प्रक्रियेमध्ये उत्पादन कोणत्या गतीने वाढते (उत्पादन वाढीचा दर) त्यालाच जास्त महत्त्व दिले गेले मात्र निर्माण झालेले राष्ट्रीय उत्पन्न गरिबांना किती मिळते? मध्यम वर्गाला किती मिळते? आणि उद्योजक-व्यापारी वर्गाला किती मिळते ह्याकडे दुर्लक्ष झाले. प्रत्येक वेळची सरकारे दुबळी पडत गेली आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीमधील विषमता सतत वाढत गेली. त्या संबंधीचे कायदेच त्या प्रकारचे केलेले असल्यामुळे ही विषमता कायदेशीर आहे असेही म्हणता येते. परंतु देशोदशीच्या उत्पन्न आणि करांचा अभ्यास करून थॉमस पिकेटी या अर्थशास्त्रज्ञाने असे दाखवून दिले आहे, की भारतातील विषमता इतर अनेक देशांच्या तुलनेने खूप जास्त आहे. त्याचा साधा अर्थ असा की १९९१ नंतर श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होत गेले, मध्यम वर्गाची परिस्थिती शिक्षणामुळे थोडी सुधारली पण बाकीचा बहुसंख्य वर्ग ग्रामीण भागात आणि शहरी भागात गरीबच राहिला. अर्थशास्त्राचा एक सिद्धांत असे सांगतो की उद्योगाने कारखानी वस्तूंचे आणि सेवांचे कितीही उत्पादन करू द्या परंतु बहुसंख्य समाजाजवळ मजुरी आणि पगाराच्या रूपाने आपण जास्त पैसा दिला नाही तर तो समाज औद्योगिक वस्तू विकत घेऊ शकत नाही आणि परिणाम म्हणून उद्योगांमध्ये मंदी येते. भारतामध्ये सध्याचे केंद्र सरकार आल्यापासून जी आर्थिक धोरणे स्वीकारली गेली आहेत (नोटबंदी, वस्तू-सेवा कर, विदेशी आणि देशी भांडवलाला पूर्ण मोकळीक) यामुळे श्रमिकांची बेरोजगारी वाढत गेली आणि परिणाम म्हणून औद्योगिक वस्तूंसाठी

मागणी कमी झाली. देशात २०१६ पासून, म्हणजे हे सरकार आल्यापासून सातत्याने मंदीची परिस्थिती आहे. त्यात कोरोनामुळे पडलेली भर आणि विस्कळीत झालेली उत्पादन व्यवस्था ही वेगळी. दोन्हींचा संकलित परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणावर बंद पडलेले सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग, खालावलेली शेती व्यवस्था, हवामान बदलामुळे झालेली अवर्षणे आणि महापूर असे एकत्र करून आजची खालावलेली अर्थव्यवस्था आपल्याला दिसून येते. जून २०२१ महिन्यापर्यंतच्या ३ महिन्यांमध्ये भारतात उत्पादन सुधारणा बरीच होत आहे असे सरकारने म्हटले. परंतु एकट्या जुलै महिन्यात ३१ लाख नोकऱ्या कमी झाल्या अशी सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या संस्थेची आकडेवारी सांगते. त्यातच उत्पादनाचा स्रोत म्हणून श्रीमंतांवर कर लावायचे नाहीत आणि गरिबांची कर देय क्षमता संपलेली आहे, हे पाहून केंद्र सरकार मोठ्या प्रमाणावर सरकारी मालकीच्या उद्योगांतील भांडवल विक्रीला काढत आहे आणि त्यासाठी संरक्षण उत्पादन कारखाने, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन, रेल्वे इत्यादी सर्व प्रकल्पांमधून सरकारची गुंतवणूक काढून घेतली जात आहे. संपूर्ण कोरोनाच्या काळामध्ये मोठ्या उद्योजकांची एकच तक्रार होती की समाजात त्यांच्या वस्तूंकरता खालून मागणी होताना दिसत नाही. परंतु सरकार मात्र यावर अडून बसले आहे की आम्ही सामान्य माणसाला बँकांमधून कर्ज उपलब्ध करून देऊ, परंतु त्यांना जगण्यासाठी रोख पैशाचा आधार देणार नाही.

त्यामुळे १९४७ पासूनचे प्रश्न खासगी क्षेत्राने सोडवले नाहीत आणि आज केंद्र सरकार हात वर करून देत आहे, असे चित्र सामान्य माणसाला दिसत आहे. यामध्ये बऱ्याच सरकारी उद्योगांचे खासगीकरण होणार म्हणून भांडवलदार वर्ग खूष आहे. त्याला वाटते की त्यातून आपले भवितव्य उज्ज्वल होईल. पण सामान्य माणसाच्या पोटात भीतीचा गोळा उठत आहे. खासगीकरणाने जास्त यंत्रे आली तर मजुरांचा रोजगार टिकेल का? मजुरीचे दर कायद्याप्रमाणे मिळतील का? भविष्यनिर्वाह निधीचे काय होईल? या सगळ्या चिंता आज २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात, स्वतंत्र भारतासमोर ७५ वर्षांनंतर निर्माण झाल्या आहेत. ह्या अस्थिरतेमधून मार्ग कसा काढायचा आणि सर्वांना रोजगार, शिक्षण, आरोग्य, चांगले राहणीमान देणारा प्रगतिशील समाज कसा निर्माण करायचा हे आव्हान आज विचार करणाऱ्या तरुणांपुढे, नागरिकांपुढे, राजकीय पक्षांपुढे आणि विचारवंतांपुढे आहे.

आपण अपेक्षा करू या की या परिस्थितीतूनही भारतीय समाज प्रगल्भ बुद्धी दाखवून मार्ग शोधून काढू शकेल!

■



दादा पुरव रिसर्च
ऑण्ड ट्रेनिंग इंस्टीटयूट
: तर्फे प्रकाशित

₹ ६०/-